निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५८ वा.
शनिवार :२२ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# महाराष्ट्रात निवडणुकीपूर्वीच १०० नगरसेवक, ३ नगराध्यक्ष जिंकले! भाजपचा सर्वात मोठा विजय!

**मुंबई**/ महाराष्ट्रात नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळीमुळे कडाक्याच्या थंडीतही राजकारण चांगलेच तापले आहे. मुंबईत भाजपने १०० चे टार्गेट ठेवले आहे. अशातच निवडणुकीआधीच महाराष्ट्रात भाजपने सर्वात मोठा विजय मिळवला आहे. महाराष्ट्रात निवडणुकीपूर्वीच १०० नगरसेवक, ३ नगराध्यक्ष जिंकले आहेत.

नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकीत भाजपने शतक ठोकले आहे. निकालापूर्वीच शंभर जागांवर भाजपच्या उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ही माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वामुळे बिनविरोध निवडीचा चमत्कार झाल्याची प्रतिक्रिया रविंद्र चव्हाण यांनी दिली. नगरपालिका आणि नगरपंचायतसाठी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आजच्या दिवशी बिनविरोध निवड झाली.

**बिनविरोध जिंकलेले नगरसेवक - १००**

**बिनविरोध निवडून आलेले नगराध्यक्ष - ३**

**कुठल्या विभागात किती नगरसेवक बिनविरोध ?**

- **कोकण- ४**
- **उत्तर महाराष्ट्र- ४९**
- **पश्चिम महाराष्ट्र- ४१**
- **मराठवाडा- ३**
- **विदर्भ- ३**

### असा आहे निवडणुकांचा कार्यक्रम

राज्य निवडणूक आयोगाकडून नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली. २ डिसेंबरला नगर परिषद आणि नगर पंचायतींसाठी मतदान घेतलं जाणार आहे. तर ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूका घेतली जाईल.

कोकण विभागात २७, नाशिक विभागात ४९, पुण्यामध्ये ६०, संभाजीनगरमध्ये ५२ आणि अमरावती विभागात ४५ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत.

१० तारखेपासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. अर्ज भरण्याची शेवटची तारीख १७ नोव्हेंबर असून, उमेदवारांच्या अर्जाची छाननी १८ नोव्हेंबरपासून होणार आहे. तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २५ नोव्हेंबर आहे. १३ हजार ३५५ केंद्रावर निवडणूक पार पडणार आहे.

दुबार मतदारांबाबत निवडणूक आयोगाकडून दक्षता घेण्यात आली आहे.




## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई**/ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय मुंबई शहर/उपनगर मार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महामंडळाच्या विविध योजनांकरिता कर्ज प्रस्ताव महादिशा पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन महामंडळाचे मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध बांधवांच्या स्वयंरोजगार, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक उन्नतीसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजना (पीएम-एजेएवाय) अंतर्गत ही अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. रोजगाराच्या संधी निर्माण करून जीवनमान उंचावणे हा या योजनांचा मुख्य उद्देश असल्याचे महामंडळाने स्पष्ट केले आहे. अर्जाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात होणार असून इच्छुक लाभार्थ्यांनी आपले अर्ज ह्रीीं-ीः//ालिलवल.ारहरीरीहींर.र्सीं.ळप या संकेतस्थळांवर करावेत. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष कार्यालयात कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

अर्ज करण्यास आवश्यक पात्रता

अर्जदार अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गातील असावा व त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे. वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी तीन लाख रुपये आहे. अर्जदार हा या महामंडळाच्या योजनांचा व इतर वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

अर्ज करण्यास आवश्यक कागदपत्रे

जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या दाखला. पाच पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅन कार्ड ची प्रत.

कोटेशन व व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या जागेचा पुरावा, व्यवसायानुसार इतर दाखले, आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल, बँक खाते क्रमांक, पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक आहे.

अनुदान योजना, बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ योजना, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या योजना, एनएसएफडीसी व एनएसकेएफडीसी शैक्षणिक कर्ज योजना या सर्व योजनांची सविस्तर माहिती, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची यादी व पात्रतेच्या अटी महामंडळाच्या महादिशा पोर्टलवर उपलब्ध आहेत. तरी सर्व इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज करण्यापूर्वी माहिती वाचून घेणे आवश्यक आहे. जास्तीत इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## बँकिंग क्षेत्रात अधिक पारदर्शकतेसाठी डी-डुप्लिकेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे - जिल्हाधिकारी आंचल गोयल




**मुंबई**/भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वतीने राबविण्यात येत असलेला 'तुमचे पैसे, तुमचा हक्क' हा उपक्रम निष्क्रिय खात्यांमधील रक्कम संबधित खातेदारास, त्यांच्या वारसांना विनासायास परत मिळण्यासाठी उपयुक्त असून सर्वच बँकांनी या उपक्रमाची अधिकाधिक जनजागृती करावी. तसेच बँकिंग क्षेत्रात पारदर्शकता वाढविण्यास आणि ग्राहक सेवेत सुधारणा घडवून आणण्यास सर्व बँकांच्या माहिती तंत्रज्ञान विभागांनी भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर डी-डुप्लिकेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी केले.

बँक ऑफ बडोदा या जिल्हा अग्रणी बँकेमार्फत मुंबई शहर जिल्ह्यामध्ये हक्क न सांगितलेल्या मालमत्तेचा निपटारा याविषयी यशवंतराव चव्हाण सेंटर सभागृहात आयोजित शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक पुनित पांचोली, बँक ऑफ बडोदाचे महाप्रबंधक सुनील शर्मा, कॅनरा बँकेचे मुख्य महाप्रबंधक रणजीव कुमार, बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक सुनील शर्मा, युनियन बँकेचे महाप्रबंधक शलजकुमार सिन्हा, पंजाब नॅशनल बँकेच्या महाप्रबंधक श्रीमती भुवनेश्वरी, युको बँकेचे महाप्रबंधक संदीप कुमार यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी, खातेदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आंचल गोयल म्हणाल्या, डी-डुप्लिकेशन तंत्रज्ञानामुळे खातेदारांचे स्पेलिंग बदललेले नाव, आडनावातील बदल किंवा वेगळे फोटो असले तरी समान खातेधारक ओळखणे सोपे होईल. या तंत्रज्ञानामुळे अनक्लेम्ड रक्कम योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यास मदत होईल. बँक खातेदारांनीही ई-केवायसी, वारस नोंद आणि पत्त्यामधील बदल बँकेस वेळेत कळविणे आवश्यक आहे. या महत्त्वाच्या कागदपत्रामुळे खात्यातील रकमेची माहिती कुटुंबीयांना सहज मिळू शकेल व खाती निष्क्रीय राहणार नाहीत. तसेच त्या खात्यांमधील रक्कम, खातेदारास, वारसांना तातडीने परत मिळेल, असा विश्वासही जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्यात विविध बँकांमध्ये असलेल्या निष्क्रिय खात्यांमध्ये असलेल्या सुमारे सहा हजार कोटी रुपयांपैकी दोन ते अडीच हजार कोटी रुपये फक्त मुंबईमधील असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती गोयल यांनी यावेळी सांगितले. सर्वाधिक लोकसंख्या घनता असलेल्या मुंबईत कामासाठी येणाऱ्या आणि नंतर गावाकडे परतलेल्या नागरिकांमुळे मोठ्या प्रमाणात निष्क्रिय खाती तयार होतात. ग्रामीण भागात अशा खात्यांचा शोध घेणे सोपे असले तरी महानगरात हे मोठे आव्हान ठरते, असेही आंचल गोयल यांनी सांगितले.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक पांचोली म्हणाले, निष्क्रिय खात्यांमधील रक्कम संबंधित व्यक्तीला सुपूर्द करणे महत्वाचे आहे. ते म्हणाले अलिकडच्या काळात सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण पाहता अशा निष्क्रिय खात्यांचा दुरुपयोग होण्याची भीती असते. त्यामुळे खातेदारांनी आपली बँक खाती सक्रिय ठेवण्यासाठी वेळोवेळी केवायसी, ई केवायसी करावी.

यावेळी बँक ऑफ बडोदाचे महाप्रबंधक सुनील शर्मा, बँक ऑफ इंडियाचे महाप्रबंधक सुनील शर्मा आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या उप महाप्रबंधक ज्योती सक्सेना यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात प्रतिनिधीक स्वरूपात निष्क्रीय खात्यांच्या दावा प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. बँक ऑफ बडोदा जिल्हा अग्रणी प्रबंधक उत्तम गुरव यांनी आभार मानले.

## धनंजय मुंडेनी विजयाचा गुलाल उधळला! परळी नगर परिषद निवडणुकीत महायुतीचे दोन उमेदवार विजयी

**बीड**/ महाराष्ट्रात नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. धनंजय मुंडेनी विजयाचा गुलाल उधळला आहे. परळी नगर परिषद निवडणुकीत महायुतीचे दोन उमेदवार विजयी झाले आहेत. हा विजय धनंजय मुंडे यांच्यासाठी अत्यंत महत्वाचा मानला जात आहे. स्थानिक पातळीवरीवल या निवडणुकीत पक्षाला विजय मिळवून देत धनंजय मुंडे यांना पुन्हा एकदा ताकद सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.




अर्ज मागे घेण्याची मुदत संपली आहे. त्यामुळे आता उमेदवारांचं चित्र स्पष्ट होत आहे. राज्यात अनेक काही ठिकाणी उमेदवारी अर्ज मागे घेतले जात आहेत. यामुळे अनेक उमेदवारांनी निवडणुकाधीच विजयी गुलाल उधळला आहे. बीड जिल्ह्यातील परळी नगर परिषद निवडणुकीत महायुतीचे दोन उमेदवार विजयी झाले आहे. अजित पवार गट आणि शिवसेनेच्या उमेदवारांनी बाजी मारली आहे.

बीडमधली परळी नगरपरिषद निवडणुक चुरशीची होईल असे चित्र होते. अशातच आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांचे नशिबच पालटले. परळीत महायुतीचे दोन उमेदवार विजयी झाले आहे, नगरसेवकपदाचे दोन्ही उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. बीडच्या परळी-नगर परिषदेत महायुतीच्या बाजूने पहिलाच निकाल हाती आला आहे.

नगरसेवक पदासाठी शिंदे गटाचा एक उमेदवार आणि अजित पवार गटाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. त्यामुळे निवडणूक होण्यापूर्वीच महायुतीच्या दोन नगरसेवक विजयी झाले आहेत. नगरपरिषद निवडणुकीतील बिड जिल्ह्यातील महायुतीच्या नगरसेवकपदाच्या उमेदवाराचा हा पहिलाच विजयी निकाल आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रभाग क्रमांक १३ मधील रेश्मा बळवंत या बिनविरोध निवडून आल्या आहेत. तर प्रभाग क्रमांक ११ मधील जयश्री गीते या शिंदे शिवसेना गटाच्या नगरसेवक पदाच्या उमेदवार बिनविरोध विजयी घोषीत झाल्या आहेत.

## कोर्टाबाहेर तुफान राडा, नागरिकांचा कोर्टात घुसण्याचा प्रयत्न, पोलिसांचा लाठीचार्ज

**मालेगाव**/ मालेगावमध्ये चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करुन हत्या करण्यात आल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. आरोपीला आज कोर्टात हजर करण्यात आलं असताना नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झाला. संतप्त नागरिकांनी कोर्टात घुसण्याचा प्रयत्न केला आहे. कोर्टाबाहेर मोठ्या प्रमाणात जमलेल्या लोकांनी पोलिसांना ढकलत आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला. आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची लोकांची मागणी असून, मागील अनेक दिवसांपासून यासाठी मोर्चे काढले जात आहेत.



**नेमकी घटना काय?**

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे १७ नोव्हेंबरला धक्कादायक घटना घडली. तीन वर्षांच्या एका चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा दगडाने ठेचून खून करण्यात आला. नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात मृतदेहाचं शवविच्छेदन करण्यात आलं. नातेवाईक आणि लोकांकडून नराधमावर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी केली जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

अल्पवयीन मुलीच्या अत्याचार आणि खून प्रकरणात मालेगाव न्यायालय परिसरात तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. याआधीही न्यायालय आवारात महिलांनी आपला आक्रोश व्यक्त केला होता तर तरुणांनी ठिय्या आंदोलन केलं होतं. न्यायालय आवराच्या दोघेही बाजूंना चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

न्यायालयीन आवारातील परिस्थिती बघता आरोपीला आणणार की व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करतील असा प्रश्न होता. याचं कारण मालेगाव कॅम्प रोडवर नागरिकांच्या संतापाची लाट आली होती. आरोपीला फाशी झालीच पाहिजे अशा घोषणा मागील चार दिवसांपासून दिल्या जात आहेत.

# समाजवादी विचारधारेचे पाईक मुलायमसिंग यादव

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज जयंती. २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशा- तील सैफई गावात जन्मलेले मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला.

आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षा- ची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले.

याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात.

तीन वर्षापूर्वी १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांचा पाईक असलेला एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला. मुलायमसिंग यादव यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारधारेचे पाईक असलेल्या मुलायमसिंग यादव यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन !

# मुंबईतील स्वच्छता विषयक 'सुविधा केंद्र' उपक्रम पथदर्शी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** / शहरी क्षेत्रा- तील स्वच्छता, पाणी-बचत आणि आरोग्य सुधारणा यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीमधून मुंबईत राबवण्यात आलेला 'सुविधा केंद्र' उपक्रम आदर्श मॉडेल ठरत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान गती घेत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या अभियानात विविध संस्था जोडल्या जात आहेत. हिंदुस्थ- ान युनिलिव्हर लिमिटेड आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त भागीदारीत सुरू झालेल्या या उपक्रमाने अल्पावधीत मोठे परिणाम साधले आहेत. सध्या मुंबईत २३ केंद्रे कार्यरत असून, लवकरच २४ वे केंद्र सुरू होणार आहे. मुंबईत आणखी २ केंद्रे बांधकामाधीन असून ७ केंद्रांचे प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका, हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड, एचएसबीसी आणि जेएसडब्ल्यू फाउंडेशन यांच्या सहकार्याने ही योजना पुढील काही वर्षांत अधिक विस्तारणार आहे.

शहरातील झोपडपट्टी आणि वंचित वस्त्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि परवडणाऱ्या स्वच्छता सुविधा देण्याचे उद्दिष्ट या केंद्रांमागे आहे. ५.५ लाख नागरिकांना आतापर्यंत याचा प्रत्यक्ष लाभ झाला असून, आरोग्यदृष्ट्यादेखील हे मॉडेल उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुविधा केंद्रे ही स्वच्छतेच्या शाश्वत व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण घटक असून त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशात आणखी सुविधा केंद्रे सुरू करण्याचे निर्दे श मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. या प्रकल्पासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणा- ले की, मुंबईसारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या महान- गरात 'सुविधा केंद्र' मॉडेलने सार्वजनिक-खासगी भागीद- ारीतून उत्तम कामाचे उदा- हरण निर्माण केले आहे. ही केंद्रे शहराच्या आरोग्यसुरक्षेत मोठे योगदान देत आहेत. या सुविधा केंद्रामध्ये उत्तम सुविधा, लोकसहभाग, वर्तणूक बदल, आर्थिक आणि पर्यावरण टिकाव आणि कार्यक्षम संचालन यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. हे सर्व अत्यंत उल्लेखनीय असून हा उपक्रम शहरी महाराष्ट्रासाठी आदर्शवत आहे.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये**

**सुरक्षित आणि सन्मानजनक स्वच्छता**

झोपडपट्टी व अनौपचारिक वसाहतींतील महिलांसाठी सुरक्षित शौचालय, मुलांसाठी स्वच्छ जागा, दिव्यांगांसाठी सुलभ रचना - या सर्व बाबींमुळे सुविधा केंद्रे अत्यंत लोकाभिमुख झाली आहेत.

**पर्यावरणपूरक मॉडेल**

जल-बचत तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षमता आणि कचरा व्यवस्थापन यामुळे पर्यावरणीय शाश्वततेचा उत्तम नमुना तयार झाला आहे.

समुदायातील महिलांचा सहभाग

प्रशिक्षित ३०० महिलांनी राबवलेल्या वर्तनबदल मोहिमेमुळे ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण मिळाले. यामुळे नागरिकांच्या सवयी, वापर आणि आरोग्य- जाणीवेत सकारात्मक बदल घडला.

**आरोग्यदायी परिणाम**

'सुविधा केंद्रां'मुळे जठरांत्र, अतिसार आणि मूत्रमार्गाच्या संक्रमणात ५०




टक्के घट झाली आहे. झोपडपट्टी क्षेत्रातील सर्वाधिक समस्या असलेल्या दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे होणारे आजार आता लक्षणीयरित्या कमी झाले आहेत.

**आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण मॉडेल**

सुरुवातीपासून ९ महिन्यांत केंद्र स्वतःचा खर्च भागवू ला- गते ही या योजनेची मोठी ताकद आहे. आज मुंबईतील सर्व २३ केंद्रे पूर्णपणे स्वयं-टिकाऊ आहेत.

# आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेल्या व्यक्तींच्या वास्तवाचा समाजशास्त्रीय मागोवा

मानवी जीवनाची रचना ही भावनिक नातेसंबंध, सामाजिक मूल्ये, आर्थिक अपेक्षा आणि मानसिक आरोग्याच्या विविध स्तरांवर उभी आहे. या सर्व घटकांच्या गुंफणीत कधी कधी असा क्षण येतो, जेव्हा एखादी व्यक्ती जीवनाचा प्रवास संपवण्याचा निर्णय घेते. आत्महत्या ही केवळ वैयक्तिक न राहता खोलवर सामाजिक परिणाम घडवणारी घटना असते. एखादी व्यक्ती या जगातून जाताना मागे ठेवून जाते ती फक्त आठवण नाही, तर भावनिक धक्क्यांनी विदीर्ण झालेले जीवन, अपराधगंडाने झाकलेली शांतता, सामाजिक चौकटींच्या चौकशीचा भार आणि भविष्याच्या असुरक्षिततेची काळोखी पोकळी. म्हणूनच अमेरिकेतील थँक्सगिव्हिंग दिवसाच्या अगोदरचा शनिवार म्हणजेच यंदा २२ नोव्हेंबर रोजी जगभर 'आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेल्या व्यक्तींचा आंतरराष्ट्रीय दिन' (खपींशीपरींळेपरश्र डीीींळींी ेष डीळलळवश ङेीी ऊू) म्हणून पाळला जातो. हा दिवस मागे उरलेल्या लोकांसाठी सांत्वनाचा, समाजासाठी आत्मपरीक्षणाचा आणि मानवी संवेदनशीलतेसाठी स्मरणरूप दिपस्तंभ आहे.

भारतीय समाजात नातेसंबंधांचे, कुटुंबप्रणालीचे आणि सामूहिक भावविश्वाचे महत्त्व अतूट आहे. अशा पायाभूत रचनेत आत्महत्येची घटना ही कुटुंबाला पूर्णपणे हादरवून टाकणारी असते. मृत व्यक्तीचा वेदनादायी शेवट पुस्तकी व्याख्येत आकस्मिक घटना म्हणून मांडता येईल, परंतु कुटुंबासाठी तो अमानवीक वेदनेचा दीर्घकालीन प्रवास असतो. सर्वात गुंतागुंतीची गोष्ट म्हणजे, प्रिय व्यक्तीने आपले जीवन संपवण्यामागील कारणे अनेकदा धूसर राहतात. कोणत्याही स्पष्ट वाटणाऱ्या कारणांमागे अदृश्य ताण, मानसिक आरोग्याची नाजूक स्थिती, सामाजिक अपेक्षा, अपयशाची भीती, आर्थिक कोंडी, बेरोजगारी, प्रेम प्रकरण, नातेसंबंधातील दडपण किंवा एकाकीपणाची असह्य भावना लपलेली असू शकते. त्यामुळे या मृत्यूचे ओझे फक्त शोकाचे नसते; ते अनुत्तरित प्रश्नांचे, गोंधळाचे आणि न सांगता निघून गेलेल्या वेदनेचे असते.

समाजशास्त्रीय विचारवंत एमिल दुर्खीम यांनी आत्महत्येचे विश्लेषण करताना सांगितले आहे की आत्महत्या ही घटना सामाजिक एकात्मता आणि सामाजिक नियमनाशी थेट जोडलेली असते. व्यक्ती समाजाच्या मूल्यांपासून, भावनिक आधाराप- ासून किंवा सामाजिक संरचनेपासून अलग झाली की आत्महत्येचा धोका वाढतो. परंतु, आत्महत्येनंतर उरलेल्या कुटुंबीयांवर सामाजिक वातावरण ज्या प्रकारे प्रतिक्रिया देते, तेही तितकेच समाजशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचे आहे. आपल्याकडे अजूनही आत्महत्येकडे कलंक, पाप, चूक, कमजोरी किंवा कुटुंबाची बदनामी अशा दृष्टीने पाहिले जाते. परिणामी, मृताच्या कुटुंबाला समाजाकडून टाळाटाळ, कुजबुज, संशय, टीका आणि अप्रत्यक्ष दोषार- ोप सहन करावा लागतो. काही दिसलं नाही का?, इतका ताण कसा घेतला?, घरात काय बिनसलं होतं? अशा प्रश्नांतून समाज नकळतपणे मानसिक हिंसा करत असतो. हा सामाजिक दबाव त्या कुटुंबाला आणखी खोल एकाकीपणात ढकलतो.

कुटुंबातील प्रत्येक सदस्यावर या घटनेचा परिणाम वेगवेगळा असतो. पालकांसाठी हे स्वतःच्या एका भागाच्या मृत्यूसारखे असते. जोडीदारासाठी ते आयुष्याच्या स्तंभाचा कोसळलेला आधार अस- तो. मुलांसाठी ते सुरक्षिततेची आणि विश्वासाची नष्ट झालेली छाया असते. भावंडांसाठी ते नात्याची अचानक तुटलेली साखळी असते. अनेक अभ्यासांनुसार आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेल्या व्यक्तींमध्ये नैराश्य, चिंता, गुंतागुंतीचा शोक (लोश्रिळ- लरींशव सीळशष), अपराधगंड, आत्मविश्वासाचा अभाव आणि स्वतः च्या ओळखीबद्दल संभ्रम यांचे प्रमाण अधिक असते. हा प्रसंग कसा झाला असेल?, का झाले?, मी काय करू शकलो असतो? अशा अनंत प्रश्नांचा मानसिक संघर्ष असतो.

विशेषतः मुलांवर याचा परिणाम अत्यंत संवेदनशील असतो. पालकांपैकी एकाने स्वतःचे जीवन संपवले, तर मुलांना असुरक्षितता, भीती, अपराधगंड, राग, नियमभंग, अभ्यासात ढिलाई, एकटेपणा आणि मानसिक अस्थिरता यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या मनात माझ्यासाठी ते का थांबले नाहीत? असा खोलवर जळजळीत प्रश्न जन्म घेतो. त्यामुळे अशा मुलांना समुपदेशन, भावनिक आधार, खुला संवाद आणि परिस्थिती समजावून सांगण्याची अत्यावश्यक गरज असते.

ग्रामीण भारतात आत्महत्येनंतरचा सामाजिक दबाव अधिक तीव्र असतो. आत्महत्या ही अजूनही वर्ज्य विषय मानली जाते. अनेक ठिकाणी मृत व्यक्तीच्या कुटुंबाकडे संशयानं पाहिलं जातं.

काहीवेळा अंधश्रद्धा, दैवी कोप, भूतबाधा, वाईट नजर, अशा स्पष्टीकरणांचा आधार घेतला जा- तो. आत्महत्येने मृत व्यक्तीच्या अंत्यविधीत देखील काही ठिकाणी भेदभाव केला जातो. कुटुंबाला सण-समारंभात, गावकऱ्यांमध्ये, नात्यात, चौकात पाहिल्या जाणाऱ्या कुजबुजीतून दिवसेंदिवस मानसिक जखमांवर मीठ चोळलं जातं. शहरांमध्ये वातावरण काहीसं वेगळं असलं तरी सामाजिक अंतर वाढल्याने एकाकीपणा आणि भावनिक तुटकता अधिक तीव्र दिसते. कुटुंबाला हवा असते तो आधार, संवेदनशीलता आणि समज. पण मिळते ती शांतता, दुर्लक्ष किंवा औपचारिक सहानुभूती.

आत्महत्या ही घटना केवळ भावनिक नसून आर्थिक आणि सामाजिक रचनेवरही खोल परिणाम करणारी असते. अनेक वेळा मृत व्यक्ती घरातील कमावता सदस्य असतो. त्याच्या अचानक जाण्यामुळे कुटुंबाचा आर्थिक समतोल पूर्णपणे बिघडतो. कृषी क्षेत्रातील संकट, बेर- ोजगारी, कर्जताण यांच्या पार्श्वभूमीवर आत्महत्येचे प्रमाण वाढते आणि त्यामुळे मागे उरणाऱ्या कुटुंबांना कर्ज, नोकरी, मुलांचे शिक्षण, आर- ोग्य, दैनंदिन गरजा अशा मूलभूत गोष्टींची तातडीची लढाई लढावी लागते. सरकारी योजना असल्या तरी त्यांचा लाभ मिळवताना प्रक्रिया जटिल, कागदोपत्री आणि वेळ- खाऊ असते. त्यामुळे कुटुंब भावनिक धक्क्यासोबतच आर्थिक संघर्षातही अडकते.

या दिवसाचे महत्त्व इथेच अधोरेखित होते. हा दिवस सांगतो की आत्महत्येमुळे प्रियजन गमावलेले लोक समाजात अदृश्य नाहीत. त्यांची वेदना खऱ्या आहेत आणि त्यांना समजून घेणे, मान्यता देणे आणि साथ देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. हेही लक्षात घ्यावे लागते की मानसिक आरोग्याविषयीची भीती, लाज, कलंक हे आजही मोठे अडथळे आहेत. जोवर मानसिक आरोग्य समस्या 'कमजोरी' मानली जातील, तोवर आत्महत्या एकलकोंडेपणाचा मार्ग राहील आणि त्यानंतरचे सामाजिक आघात अधिक भीषण होतील.

मानसिक आरोग्य सेवा उप- लब्ध करून देणे, कुटुंबाला समुपदेशन, सपोर्ट ग्रुप, समुदाय पातळीवरील जागरूकता, शाळा- महाविद्यालयांमध्ये भावनिक आरोग्य शिक्षण, कार्यस्थळांवर ताणनियंत्रण कार्यक्रम, ग्रामीण भागात आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, कुटुंबांना आर्थिक सहाय्य ही सर्व पावले अत्यंत महत्त्वाची आहेत. आत्महत्येमुळे झालेल्या मृत्यूंना रोखणे हा एक भाग आहे; पण त्यानंतर मागे राहिलेल्या कुटुंबांना पुन्हा उभे करणे हा दुसरा, अनेकदा दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्व- पूर्ण भाग आहे. समाजाने त्यांच्यासोबत उभे राहण्यासाठी संवेदनशीलता, सहानुभूती आणि समज वाढवली तर त्यांच्या पुनर्बांधणीचा प्रवास सुकर होऊ शकतो.

या दिनाचे सर्वात मोठे महत्त्व असे की तो आपल्या सामाजिक मूल्यांचे पुनर्मूल्यांकन करण्यास भाग पाडतो. आपण नातेसंबंधांच्या नाजूकतेकडे किती प्रतिसाद देतो? आपण भावनिक संकटांचा सामना करणाऱ्या व्यक्तींना किती समजून घेतो? कुणाच्या अंतरी चाललेला संघर्ष आपणास किती दिसू शकतो? आणि सर्वांत महत्त्व- ाचे म्हणजे आम्ही, समाज म्हणून, दुः खाच्या काळात कुणासाठी आधारवड होऊ शकतो का? हा दिवस सांगतो की प्रत्येक शोकाच्या मागे अक्षम्य वेदना दडलेली असते; आणि प्रत्येक वेदनेच्या मागे समजून घेण्याची आणि आधार देण्याची संधी असते.

शेवटी, आत्महत्या हा शेवट असू शकतो, परंतु मागे उरलेल्या व्यक्तींचा प्रवास हा नव्या सुरुवा- तीचा असतो. अवघड, वेदनादायी, पण शक्य. योग्य सामाजिक आधार, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता आणि मानवी संवेदनशीलता यांच्या मदतीने ते पुन्हा जगण्याचा मार्ग शोधू शकतात. या दिवसाचा संदेश अत्यंत स्पष्ट आहे की दुःखाला शब्द द्या, वेदनेला मान्यता द्या, आणि माणुसकीने माणसाजवळ उभे राहा. कारण कधी कधी फक्त एक ऐकणारे कान आणि एक समजून घेणारा हातही एखाद्याच्या पुनर्जन्माचा आधार ठरू शकतो.

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# आरक्षणाच्या बाबतीत घोळ का? सरकारने कायद्याचा सल्ला का घेतला नाही?

देशातील कोणतीही सरकार असो,सरकार म्हटले की,राज्याची व तेथील जन- तेची मोठी जबाबदारी सरकारवर व सत्ताधाऱ्यांवर असते.परंतु राजकीय पोळी शेकण्यासाठी स्वमताने आरक्षण जाहीर करणे किंवा कोणतेही काम करणे हा तर कायद्याने मोठा गुन्हा आहे असे मला वाटते.

विरोधक किंवा याचिका करता प्रत्येक सरकारच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या चुका काढत असतात आणि काढल्याच पाहिजे कारण हा लोकशाहीचा अधिकार आहे. परंतु आर- क्षण जाहीर करतांना सरकारने कायदा,विरोधक, सामाजिक संघटना, बुध्दीजीवी, समाज यांच्याशी सविस्तर चर्चा किंवा विचार-विमर्श का केली नाही? सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून जर आरक्षण जाहीर केले असते तर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला आरक्षणाचा सवालच केला नसता.माझ्या माहिती नुसार ओबीसी -२७ टक्के आरक्षण,एसी-१३ टक्के आरक्षण, एसटी -७ टक्के आर- क्षण आणि एनटी/व्हिजे-३ टक्के आरक्षण अशाप्रकारे एकुण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा कायद्यानुसार ठरविण्यात आली आहे.परंतु कायद्याचा किंवा सर्वो च्च न्यायालयाशी सल्लामसलत न करता सरकारने आपल्या मर्जीने होवून घातलेल्या निवडणुकीमध्ये आरक्षण जाहीर केले ही तर सरळ-सरळ कायद्याची पायमल्लीच म्हणावी लागेल. राज्यातील ४२ नगरपंचायती आणि २४६ नगरपरिषद निवडणुकीत आरक्षणाच्या घोळामुळे टांगती तलवार आजही कायम असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाने ५० टक्के मर्यादा ओलांडल्याने सुप्रीम कोर्टाने नाराजी व्यक्त केली आहे.सरकारने ८३ पंचायत समित्या,१७ जिल्हापरिषदा,५७ नगरपालिका, आणि २ महानगरपालिका अशाप्रकारे १५९ ठिकाणी ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची बाब समोर आली आहे.आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. नंदुरबार जिल्हा परिषदेमध्ये एकूण आरक्षण १०० टक्के, पालघरमध्ये ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, धुळे ७३ टक्के, नाशिक ७२ टक्के तर अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला जिल्हा परिषदांमध्ये ६० ते ७० टक्के दरम्यान आरक्षण लागू झाले आहे.नागपूर, ठाणे, वाशिम, नांदेड, जळगाव, हिंग- ोली, वर्धा आणि बुलढाणा या आठ जिल्ह्य परिषदांमध्ये ५१ ते ६० टक्के दरम्यान आरक्षण देण्यात आले आहे.या आरक्षणाच्या विरोधात २८ याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.

सरकारने जर आरक्षणाचा घोळ निर्माण केला नसता तर हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेल- ाच नसता.परंतु सरकारने आर- क्षणाला व नियमाला काडीमोड केल्याने हा मुद्दा उपस्थित झा- लेला आहे हे स्पष्ट दिसून येते. निवडणूक आयोग सुध्दा सर्वो च्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिक्षेत आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबरला सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेते याकडे राज्य निवडणूक आयोगासह सर्वांचेच लक्ष ला- गले आहे.

न्यायालयाची पुढील सुना- वणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाण- ार नाही असे चित्र दिसत आहे.सरकारच्या चुकीमुळे निवडणुकांची अनिश्चितता निर्माण झाली आहे.यामुळे राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवार यांची परिस्थिती तळ्यात नि मळ्यात झाल्याची दिसून येते. भार- तात लोकशाही आहे त्यामुळे सरकारने कायद्याचा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान करावा व भविष्यात अशाप्रकारेचे घोळ किंवा चुका निर्माण होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.जय हिंद.

**-लेखक रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार ) नागपूर.**

## संक्षिप्त

**पैठण एमआयडीसी पोलिस ठाण्यात नागरिकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने महत्वपूर्ण बैठक संपन्न**

## रात्रीच्या वेळी विनाकारण घराबाहेर पडाल तर कारवाईला सामोरे जाल.- सपोनि ईश्वर जगदाळे

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण/हारुन/ शेख /** पैठण एम.आय.डी.सी पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी दि.(२०) गुरुवार रोजी पोलिस ठाणे अंतर्गत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये



या अनुषंगाने पोलिस ठाणे हद्दीतील विविध राष्ट्रीयकृत बँकाचे मॅनेजर,पतसंस्था चालक त्यांचे मॅनेजर तसेच या परिसरातील सोने चांदीचा व्यापार करणाऱ्या दुकानदारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. या बैठकीत बँका व त्यांचे एटीएम तसेच सोन्या चांदीचे दुकानाच्या सुरक्षा संदर्भात त्यांच्या व्यवस्थापकांनी केलेली सुरक्षा व्यवस्था,सायरन याची माहिती घेत त्यांना या ठिकाणी उच्च दर्जाची सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे, आणि बँका पतसंस्था तसेच सराफा दुकानाच्या सुरक्षा करिता त्यांच्या आसपास २४ तास शस्त्रधारी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याविषयी सूचना करण्यात आल्या. यासोबतच यावेळी पोलिस ठाण्याचे बीट अंमलदार तसेच विविध गावचे पोलीस पाटलांची संयुकरित्या बैठक घेऊन गाव,वस्तीमधे दरोडा,रॉबरी,घरफोडी व चोरी आणि इतर कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या अनुषंगाने सतर्कता बाळगावी.तसेच जर कोणालाही आपले गाव, वस्तीच्या परिसरात कोणी अनोळखी इसम आढळल्यास तात्काळ पोलीस स्टेशनला देण्यात यावी. गाव,वस्ती येथे वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांनी आपले मौल्यवान सोन्या चांदीचे दागदागिने व रोख रक्कम घरात न ठेवता बँक लॉकर मध्ये ठेवण्याबाबत सूचना देऊन पोलिस ठाणे हद्दीतील नागरिकांना सुरक्षित वाटावे यासाठी पोलिसांची गावागावात रात्रीची गस्त वाढवण्यात आली आहे.त्यामुळे रात्रीच्या वेळी कोणीही विनाकारण घराबाहेर पडू नये अचानक कोंबिंग ऑपरेशन राबवून कारवाई करण्यात येणार आहे. असे पैठण एम.आय.डी.सी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी यावेळी सांगितले.

# त्रिभाषा धोरण निश्चिती समिती बुधवारी संभाजीनगरात

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी निश्चित करण्यासाठी राज्य शासनाने गठीत केलेली डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती येत्या बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी संभाजीनगरात येत असून विविध घटकांचे म्हणणे प्रत्यक्षरित्या जाणून घेणार आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पूर्वतयारीचा आढावा घेतला. बैठकीला शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) अरुण शिंदे, डाएट प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. विशाल तायडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. केशरचंद राठोड, पवनकुमार गोरे, देवगिरी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. समिता जाधव, डॉ. एम. एफ. मेवाड तसेच पोलिस निरीक्षक शिवाजी तावरे उपस्थित होते.

**बैठकीचे वेळापत्रक**

समिती दि. २५ नोव्हेंबर रोजी रात्री संभाजीनगरात दाखल



**समितीची रचना**

**अध्यक्ष -** डॉ. नरेंद्र जाधव,**सदस्य -** डॉ. सदानंद मोरे, डॉ. वामन केंद्रे, डॉ. अप्रणा मॉरिस, डॉ. सोनल कुलकर्णी, डॉ. मधुश्री सावजी, डॉ. भूषण शुक्ल **सदस्य सचिव -** संजय यादव, राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा अभियान

होणार आहे.

दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून एमआयटी महाविद्यालयाच्या आनंद सभागृहात भाषा तज्ज्ञ, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, बालमानस तज्ज्ञ, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, शिक्षण संस्था चालक, शिक्षक-पालक संघ तसेच प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांच्याशी समिती संवाद साधणार आहे.

या सर्व घटकांकडून त्रिभाषा धोरणाबाबत सूचना, मते आणि शिफारसी प्रत्यक्ष ऐकून घेण्याचा हेतू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**दूरदृष्य प्रणालीची सुविधा**

विभागातील पाचही जिल्ह्यांतील नागरिक व तज्ज्ञांना या चर्चेत सहभागी होता यावे यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात येत आहे.

तर ज्या व्यक्तींना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नाही, त्यांच्यासाठी संबंधित जिल्ह्यांतून दूरदृष्य प्रणालीची सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.


# टी.सी. हरविल्याबाबत

मी, **पतंगे संस्कृती बप्पासाहेब,** वय १९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण, रा. आनंदनगर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर, येथील रहिवासी आहे.

सन २०२४ मध्ये वरील पत्त्यावर राहात असताना मी सन ज्युनिअर कॉलेज, गायकवाड, जळगाव (ता. शेवगाव, जि. अहमदनगर) येथून बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहे.परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर महाविद्यालयाकडून मला मूळ टी.सी. (Transfer Certificate) नियमितरीत्या प्राप्त झाली होती. मात्र, अलीकडेच घरातील सामान शिफ्टिंग/हलवित असताना ती मूळ टी.सी. माझ्याकडून अनवधानाने हरवली आहे. ती शोधूनही मिळून आलेली नाही. त्यामुळे टी.सी. प्रत्यक्षात गहाळ झाल असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**तरी कोणास मूळ टी.सी. सापडल्यास कृपया वरील पत्त्यावर संपर्क करावा, ही विनंती.**

**स्वाक्षरी/-**
**(पतंगे संस्कृती बप्पासाहेब)**


# सिपेटमध्ये बेरोजगार युवक, युवतींसाठी निवासी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** राज्यातील अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी), अपंग (पीडब्लुडी) व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या (इडब्लुएस) प्रवर्गातील युवक व युवतींकरीता प्लॅस्टिक प्रोसेसिंग तंत्रज्ञान संबधी ४ महिने कालावधीच्या नि:शुल्क रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता (निवासी) केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्था (सिपेट) या रसायन व पेट्रोरसायन विभाग, रसायने व खत मंत्रालय भारत सरकारच्या अंतर्गत संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात आले आहेत.

प्रशिक्षणार्थींची निवड २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सिपेट, छत्रपती संभाजीनगर येथे मूळ कागदपत्रांची तपासणी करून व मुलाखती द्वारे करण्यात येणार आहेत. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कोणताही प्रवास भत्ता किंवा शुल्क दिले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांची २६ नोव्हेंबर,२०२५ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. अर्जाचा नमुना ु.लळशिं.सीं.ळप या वेबसाईट वर उपलब्ध आहे. तरी प्रशिक्षणास इच्छूक पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरून व आवश्यक सर्व शैक्षणिक कागदपत्र (साक्षांकित प्रती), फोटोसहित सिपेट - छत्रपती संभाजीनगर पत्त्यावर पाठविण्यात यावे. अधिक माहितीसाठी: ९३२५६८७९१०, ९६०१३६४५५०, ९१४५६७५५८५ या क्रमांकावर अथवा vtc-aurangabadcipet.gov.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

या निवासी कौशल्य विकास प्रशिक्षणाचे प्रायोजक सॅबीक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसआयपीएल) हे आहेत. सिपेट भारत सरकारची प्लॅस्टिकमध्ये प्रशिक्षण देणारी अग्रणी संस्था असुन सॅबीक इंडिया प्रायव्हेट लि. (एसआयपीएल) हरियाणा यांच्या सहाय्याने सीएसआर अंतर्गत मशिन ऑपरेटर - प्लॅस्टिक प्रोसेसिंग (एमओ-पीपी) कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थींना प्लॅस्टिक प्रोसेसिंग तंत्रज्ञान संबधी प्रशिक्षण दिले जाते. ज्यामुळे त्यांना नामांकित उद्योगामध्ये रोजगार प्राप्त करता येईल. या प्रशिक्षणाचा कालावधी एकूण ४ महिने (६०० तास) असून ५५ जागा असणार आहे. यासाठी वयोमर्यादा १८-३० वर्षे राहणार आहे.

प्रशिक्षणासाठी निवड होण्यासाठी ११ वी उत्तीर्ण किंवा १० वी उत्तीर्ण आणि १.५ वर्षाचा संबंधित अनुभव किंवा ८ वी उत्तीर्ण आणि ४.५ वर्षाचा संबंधित अनुभव किंवा संबंधित एनएसक्युएफ स्तर ३ आणि १.५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. प्रशिक्षणाच्या निवडीसाठी वयोमर्यादा अनुसूचीत जाती, जमाती करीता ०५ वर्ष आणि इतर मागासवर्गीयांकरीता ०३ वर्ष शिथील असणार आहे.

निवासी प्रशिक्षणाकरीता पात्र प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणार आहे. यापूर्वी सिपेट -छत्रपती संभाजीनगर येथून प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षणार्थी पात्र असणार नाहीत.


## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

जा.क्र./मनपा/ई- निविदा / २०२५/४१३
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक :- २०.११.२०२५

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस गट नं. ७०८, मौजे चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर येथील आरक्षण क्र. ०२ खेळाचे मैदान ही जागा भाडेतत्वावर देणेसाठी स्वारस्य प्रगटन (E.O.I) मागविण्यात येत आहे. | २४.११.२०२५ |
| २. | वॉर्ड क्र. ७१ क्रांतीनगर अंतर्गत भीमपुरा-उस्मानपुरा भागातील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे व दुरूस्त करणे. | २४.११.२०२५ |
| ३. | झोन क्र. ०५ अंतर्गत मनपा शाळा, समाजमंदीर, प्रशासकीय ईमारती येथील वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २४.११.२०२५ |
| ४. | वार्ड क्र. ८६ अंतर्गत वडारवाडी येथील गल्ली नं १,२ आणि ३ मधील ड्रेनेज लाईन बदलणे. | २५.११.२०२५ |
| ५. | वार्ड क्र. ८६ अंतर्गत वडारवाडी येथील गल्ली नं ४,५ आणि ६ मधील ड्रेनेज लाईन बदलणे. | २६.११.२०२५ |
| ६. | मनपाच्या ज्योतिनगर कवितेची बाग येथे उद्यान विषयक कामे करणे. | २६.११.२०२५ |
| ७. | महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयामध्ये वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे. | २६.११.२०२५ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**सिस्टीम मॅनेजर (ई-निविदा)**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**


# खुलताबाद नगरपरिषद निवडणूक शिंदे सेना व भारतीय जनता पार्टीमध्ये लटकली

## भाजपाने विश्वासघात केल्याचा शिंदे सेनेचा आरोप निवडणुकीत भाजपाला धडा शिकवण्याचा इशारा.

**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी व शिंदे सेनेमध्ये चांगलीच लटकली असून या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने शिंदे सेनेचा विश्वासघात केला असून त्यांना चांगला धडा शिकवणार असल्याचा इशारा शिंदे सेनेचे नेते माजी सभापती किशोर कुकलारे यांनी खुलताबाद येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

राज्यामध्ये भारतीय जनता पार्टी व शिंदे सेनेमध्ये युती असून या दोन्ही पक्षातील खदखद मागील अनेक दिवसांपासून सुरू आहे. राज्य पातळीवर सुरू असलेला बेबनाव स्थानिक पातळीवर आला असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत हे दोन्ही पक्ष समोरासमोर उभे ठाकले आहेत.या यासंदर्भात बोलताना कुकलारे आणि म्हणाले की खुलताबाद नगरपरिषद निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे आमदार व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी शिंदे सेनेला सन्मान जनक वागणूक दिलेली नाही. उलट प्रभाग क्रमांक दोन मधील शिंदे सेनेचे उमेदवार लिंगायत यांना आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी भाग पाडले त्याच प्रमाणे प्रभाग तीन मधील शिवसेनेच्या माजी नगरसेविकेच्या पतीला उमेदवारी दिली.या सर्व बाबी शिंदे सेनेला खटकल्या असून निवडणुकीमध्ये विश्वासघातकी भारतीय जनता पार्टीला धडा शिकवण्याचा निश्चय शिवसैनिकांनी केला असून नगराध्यक्ष व इतर नगरसेवकांच्या जागेवर शिंदे सेना विजयी होईल असा विश्वास कुकलारे यांनी यावेळी व्यक्त केला .यावेळी तालुका प्रमुख विशाल खोसरे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बाबासाहेब बारगळ युवराज नलावडे माजी नगरसेवक गीताराम काळे फकीरचंद काळे पोपट वेताळ, गटनेते नरेंद्र सिंग साळुंखे उमेश बारगळ.वीरेंद्र वाघ पांडुरंग



काळे किरण मुळे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळामध्ये राज्यांमध्ये विकास कामांनी चांगलीच गती घेतली होती सध्या त्यांच्याकडे नगर विकास खाते असून सेनेचा नगराध्यक्ष झाल्यास खुलताबाद शहराच्या विकासासाठी भरघोस निधी प्राप्त होणार आहे .

त्याच प्रमाणे पालकमंत्री संजय शिरसाठ व खासदार संदिपान भुमरे यांच्या मार्फत ही खुलताबाद शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे कुकलारे यांनी सांगितले

कोणत्याही निवडणुका धनशक्तीवर जिंकण्याची सवय भारतीय जनता पार्टीला लागली असून सामान्य जनते सोबत या पक्षाची फारकत झाली आहे. जनतेमध्ये आता जागृती होत असून भारतीय जनता पार्टीला आगामी काळामध्ये जनतेच्या रोशाला सामोरे जावे लागणार असल्याचे कुकलारे यांनी सांगितले.

# करंजखेडा येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची संवाद दौऱ्याची आयोजन

**( राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाच्या पदाधिकाऱ्यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश. मशालच उमेदवार व मशाल चिन्ह घेऊन मतदारापर्यंत जा जा.विजय आपलाच आहे- विरोधी पक्षनेते अंबादास दानवे.)**



**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील करंजखेड उमेदवार हा दुसरा तिसरा कोणी नसून मशालच उमेदवार आहे व मशाल चिन्ह घेऊन मतदारापर्यंत जा विजय निश्चितच आपला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष सर्वसामान्य व शेतकऱ्यांच्या हितासाठी व उज्वल भविष्यासाठी कटिबंध्द आहे.करंजखेड जिल्हा परिषद गटातून प्रकाश गाडेकर हे इच्छुक असून प्रकाश गाडेकर हे माझे जुने मित्र असून त्यांचा स्वभाव हा शिवसेनेचा आहे.शिवसेनेतच असे धडक बेधडक लोक तयार झालेले आहेत.जे आहे ते मागे न बोलता तोंडावर बोलण्याची सवय,रोखठोक बोलण्याची सवय प्रकाश गाडेकर यांच्यामध्ये आहे.

लोकांसाठी व लोकांमध्ये राहून काम करणारा प्रकाश गाडेकर आहे.स्वतःचा नाही तर मतदारांचा,कार्यकर्त्यांचा विचार करणारा प्रकाश गाडेकर आहे.आज अनौपचारिक प्रवेश त्यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात झालेला असून नगरपालिका निवडणुकीनंतर मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांच्या हस्ते नक्कीच पक्षप्रवेश करू असे प्रतिपादन माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले. ते करंजखेड येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आयोजित संवाद दौऱ्यात बोलत होते.

यावेळी उपस्थित माजी आमदार उदयसिंह राजपूत यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले की, प्रकाश गाडेकर यांचा स्वभाव हा रोखठोक असून लोकांमध्ये मिसळून लोकांसाठी काम करण्याची सवय प्रकाश गाडेकर यांना आहे. स्वतःचा नाही तर दुसऱ्याचा विचार करणारा असा नेता प्रकाश गाडेकर आहे.येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मशाल हे चिन्ह घेऊन मतदारापर्यंत जाऊन जास्तीत जास्त आपल्या पक्षाचे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन त्यांनी केले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला.

यावेळी शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख बाबासाहेब मोहिते,तालुकाप्रमुख संजय मोटे,शिवसेना महिला आघाडीच्या सरपंच रूपाली मोहिते,करंजखेड गावाचे माजी सरपंच हय्यास सय्यद,उपतालुकाप्रमुख संजय राजपुत, मेघश्याम शेठ तायडे,विठ्ठल मनगटे,विभाग प्रमुख अनिल चव्हाण,उपविभाग प्रमुख बाबुराव सोनवणे,नाना येवले,रामेश्वर ताजने,अंबादास जाधव,आप्पा बोराडे, योगेश जंजाळ,विलास निकम,नाशिकराव काळे,शिवाजी नागोडे, कृष्णा सहाने,एकलव्य संघटनेचे मराठवाडा प्रमुख रमेश माळी,एकनाथ मोरे,चिमणापूरचे सरपंच परमेश्वर सोळुंके,माजी सरपंच रवींद्र ढोणे,आप्पासाहेब देशमुख, नामदेव अहिरे,रोहिदास ढोणे,ग्रामपंचायत सदस्य रत्नाकर जाधव,ममराज पवार,सचिन जाधव,सागर मातेरे,नथ्थु गांगड,मुजाहिद खान,परवेज खान, जावेद शेख,ओंकार पवार,पुनमचंद पवार, रामचंद्र चव्हाण,नितीन राठोड,गोकुळ सोळुंके विलास मोटे,अनिल सपकाळ,सौरभ ढोणे,विनोद सोळुंके,अतुल सोळुंके, यांच्यासह शिवसेना पदाधिकारी,शिवसैनिक व करंजखेड परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
जालना
शनिवार २२ नोव्हेंबर २०२५


## संक्षिप्त

### २६ नोव्हेंबर रोजी हुंडा विरोधी दिनानिमित्त हुंडा विरोधी सप्ताह होणार साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** महिला व बाल विकास मंत्रालय मुंबई शासन राजपत्र दि. २५ जुलै २०१६ अन्वये हुंडा प्रतिबंधक अधिनियम १९६१च्या कलम ८(ब)(१) आणि महाराष्ट्र राज्य हुंडा प्रतिबंधक नियम २००३ च्या नियम ४ नुसार राज्यस्तरावर आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हास्तरावर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अणि तालुकास्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी हे हुंडा प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत. तरी प्रत्येक हुंडा प्रतिबंधक अधिकारी आणि जिल्ह्यातील सर्व सुजान नागरिकांनी २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदी दिन म्हणून तर त्यापुढील ७ दिवस हुंडा बंदी सप्ताह म्हणून साजरा करावा, असे अवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

सध्यस्थितीमध्ये असे प्राकर्षाने निदर्शनास येत आहे की, समाजामध्ये हुंडा प्रथा अजूनही कायम असून या कुप्रथेच्या निर्दोष महिला बळी पडत आहेत. विवाहाच्या वेळी मागितलेला आर्थिक लाभ, रोख रक्कम अथवा विवाहच्यावेळी अथवा विवाहानंतर केंव्हाही जी रक्कम किंवा मालमत्ता, वस्तु, दागदागीने ईत्यादी मागण्यात येते त्याला हुंडा समजले जाते. सदर कायदा असूनही त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. या कुप्रथेला आळा बसणे नितांत आवश्यक आहे तरच समाजामध्ये महिला निर्भीडपणे जगू शकतील. या करीता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांचे कार्यकक्षेत अतिशय जागृतपणे सदर कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करणे करीता प्रचार प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. हुंडा देणे, घेणे किंवा घेण्यास प्रोत्साहन तसेच गुन्हा घडल्यास नमुद अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. समाजातुन या कुप्रथेचे समुळ उच्चाटन करणे आवश्यक आहे. असेही कळविले आहे.

### केसर जवळगा वाद प्रकरण - महा पोलीस मित्र संघाच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे शांततापूर्ण तोडगा

**आत्ताच एक्सप्रेस**

**सुखापूरी प्रतिनिधी/** केसर जवळगा परिसरातील वाद प्रकरणात महा पोलीस मित्र संघ यांनी तात्काळ पुढाकार घेत समाजातील तणाव शांत करत दोन्ही बाजूंमध्ये समाधानकारक तोडगा काढला आहे. संघाच्या सक्रिय हस्तक्षेपाचे स्थानिक नागरिकांकडून कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केसर जवळगा येथे दोन पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती चिघळू नये तसेच वाद वाढू न देता प्रश्नाचे मूळ स्वरूप समजून घेण्यासाठी आज महा पोलीस मित्र महाराष्ट्र राज्य संघाने आष्टा कासार येथील संबंधित मुलीच्या घरी जाऊन प्रत्यक्ष भेट दिली. संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी दोन्ही



पक्षांकडील माहिती शांतपणे ऐकून घेतल्याचे सांगण्यात आले.

यानंतर हे प्रकरण तंटामुक्त समितीचे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत दोन्ही बाजूंशी चर्चा करून हाताळण्यात आले. संयमित चर्चेनंतर दोन्ही पक्षांनी आपापल्या बाजू मांडल्या आणि समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण मैत्रीपूर्ण पद्धतीने निकाली काढण्यात आले. संघाच्या तात्काळ कारवाईमुळे व न्याय्य मध्यस्थीमुळे हा वाद कोणताही ताण-तणाव न वाढता शांततेत मार्गी लागला. या हस्तक्षेपामुळे परिसरात पुन्हा शांततेचे वातावरण निर्माण झाल्याचा आनंद स्थानिक नागरिकांसह महा पोलीस मित्र संघाने व्यक्त केला आहे. महा पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य समाजातील शांतता, सलोखा, सुरक्षा आणि सौहार्द टिकवण्यासाठी सदैव तत्पर असून अशा सामाजिक जबाबदारीच्या कार्यातून संघाची सकारात्मक भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### अंकुशराव टोपे महाविद्यालय क्रिकेट संघ छत्रपती संभाजी नगर विभागातून प्रथम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व विभागीय क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ व १९ नोव्हेंबर रोजी १९ वर्षातील शालेय विभागीय स्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन एमआयटी कॉलेज छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना या संघाने देवगिरी महाविद्यालय



छत्रपती संभाजीनगर या संघावर १५ धावांनी विजय मिळवून राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत करिता संघ पात्र ठरला. या विजय खेळाडूंचा सत्कार माजी आरोग्यमंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ.राजेशभैय्या टोपे साहेब, सचिव सौ.मनिषाताई टोपे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सह प्रशासकीय अधिकारी प्राचार्य राहुल भालेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भुजंग डावकर, प्रा. चंद्रकांत लाटेकर, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, कार्यालयीन अधीक्षक श्री सुरेश चव्हाण, डॉ. शंकर तिकांडे, ॲड. बाबासाहेब भुतेकर,कोच जफर शेख, प्रा. राज पवार व सीताराम वाघ यांनी विजय संघाचे अभिनंदन केले. या विजय संघामध्ये कर्णधार ओमकार वाघ, उपकर्णधार राफे सौदागर, हर्षराज राठी, वेदांत देशपांडे, ज्ञानेश्वर राठोड, ओमकार वाघमारे, शेख फरहान, पवन लिखे, अभय चंदेल,अर्शद खान, राज ठाकूर, सय्यद अवेज, झहीर खान या खेळाडूंचा सहभाग होता. दिनांक २४ व २५ नोव्हेंबर रोजी क्रीडा संकुल नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेकरिता सर्वांनी संघाला शुभेच्छा दिल्या.

# न्यायालयातील हिरकणी कक्षाचे उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** जालना येथील मुख्य न्याय दंडाधिकारी जालना न्यायालयाच्या प्रांगणातील 'हिरकणी कक्षा'चे उद्घाटन आज जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते यांच्या हस्ते संपन्न झाले.





न्यायालयीन महिला अधिकारी, महिला कर्मचारी व न्यायालयात कामानिमित्त येणाऱ्या महिला, विशेषतः लहान बालकांसह येणाऱ्या मातांसाठी सुरक्षित व सुसज्ज जागेची गरज ओळखून हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते, प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती शेख, मुख्य न्याय दंडाधिकारी सीमा पाडोळीकर, श्रीमती तारू, श्रीमती दुगावकर, रोहिना अंजुम, श्रीमती मुजावर, श्रीमती शिंदे, श्रीमती कदम, वकील संघाचे जिल्हाध्यक्ष ड. अनिरुद्ध घुले, जिल्हा सरकारी वकील ड. बाबासाहेब इंगळे, कोर्ट मॅनेजर पंकज जैन, प्रबंधक श्री. कुलकर्णी, अधिक्षक श्री.जोशी, विजय बावकर, एम.डी.गायकवाड,श्री. शेटे, श्री, साबळे यांच्यासह न्यायालयीन महिला न्यायाधीश व कर्मचारी उपस्थित होते.

हिरकणी कक्षामध्ये स्तनपानासाठी स्वतंत्र जागा, बसण्याच्या योग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच मुलांसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे न्यायालयात येणाऱ्या महिलांना दिलासा मिळणार असून त्यांच्या अडचणी कमी होणार आहेत.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांच्या हस्ते हिरकणी कक्षाच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली.

### बँकेने वारंवार आधार कार्ड व पॅन कार्ड ग्राहकास मागून वेठीस धरू नये! बाबासाहेब वानखेडे यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** जालना जिल्ह्यातील सर्वच राष्ट्रीयकृत व खाजगी बँका पुन्हा-पुन्हा ग्राहकांना आधार कार्ड, पॅनकार्ड मागवून ग्राहकास वेठीस धरीत आहे. खाते उघडतांना बँक आधार कार्ड, पॅनकार्ड घेवूनच खाते उघडल्या जाते. त्यानंतर पुन्हा-पुन्हा आधार कार्ड, पॅनकार्ड मागण्याची गरज काय? असा प्रश्न मॉ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब वानखेडे यांनी उपस्थित केला. यासंदर्भात अर्थमंत्री सितारामन्, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, जिल्हाधिकारी व लिड बँकेचे महाव्यवस्थापक यांना निवेदन दिले आहे. याबाबत श्री. वानखेडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की, भारतीय स्टेट बँकेसह राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका खाते उघडल्यानंतर आधार कार्ड व पॅन कार्डची मागणी



करून, खात्याला लिंक करायचे, केवाआयसी करायची असे सांगतात. परंतू खाते उघडतांना ग्राहकांचा आधार कार्ड व पॅनकार्ड खात्याला लिंक का केल्या जात नाही, पुन्हा -पुन्हा आधार कार्ड व पॅनकार्ड कश्यासाठी मागितल्या जाते. यामुळे सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. तरी आता येथून पुढे बँकेने ग्राहकांना एकदा आधार कार्ड व पॅन कार्ड घेतल्यानंतर पुन्हा - पुन्हा त्याच कागदपत्राची मागणी करू नये, अशी मागणी वानखेडे यांनी केली आहे.

# जालना महापालिका आरक्षण सोडत वादात!

## नागरिकांना हरकतीची संधी मिळण्याआधीच आयोगाचा अचानक दुरुस्ती आदेश; काँग्रेस नेत्यांची तीव्र हरकत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** जालना शहर महानगरपालिका निवडणूक-२०२५ च्या आरक्षण प्रक्रियेवर गंभीर शंका उपस्थित करत जालना शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गणेश चांदोडे आणि महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव सुरज यलगंठवार यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे हरकत अर्ज दाखल केला आहे. या हरकतीत आयोगाने केलेल्या एकतर्फी दुरुस्ती आदेशावर सरळसरळ मनमानी, गैरप्रकार आणि कायदेशीर प्रक्रियेचा भंग झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. ११ नोव्हेंबरला सोडत होती मात्र, हरकत कालावधी सुरू होण्याआधीच आदेशात दुरुस्ती करण्यात आली.

जालना महापालिका निवडणुकीसाठी ११ नोव्हेंबर २०२५ रोजी आरक्षण सोडत झाली. त्यानंतर १७ ते २६ नोव्हेंबर असा हरकतीसाठी अधिकृत वेळ जाहीर करण्यात आला होता. पण या कालावधीला प्रारंभ होण्याआधीच, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी, राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग १ आणि ७ चे आरक्षण बदलून टाकणारा दुरुस्ती आदेश जाहीर केला.

म्हणजेच नागरिकांनी हरकत द्यायची वेळच आलेली नाही, तोच आरक्षणात गुप्त बदल? करण्यात आले.

या प्रकारावरून असे दिसून येते की नैसर्गिक न्यायाचा भंग झाला असून जनतेला मात्र वंचित ठेवण्याचे काम होत असल्याचे काँग्रेस चे गणेश चांदोडे आणि भलगठवार यांनी आपल्या तक्रारीत स्पष्ट म्हटले आहे. तक्रारीत म्हटले आहे की, आयोगाने केवळ एका व्यक्तीच्या तक्रारीवर आधीच निर्णय बदलला असून बाकी सर्व नागरिक, संभाव्य उमेदवार, सामाजिक संघटना यांना आपले म्हणणे मांडण्याचा कायदेशीर हक्कच मिळाला नाही. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया मनमानी व एकतर्फी होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

काँग्रेस नेत्यांनी निदर्शनास आणले की, मूळ सोडत ११ नोव्हेंबर २०२५ च नागरिकांना दाखवायला हवी होती.

त्यावर सर्वसामान्यांची हरकत घेऊनच बदल करणे कायद्यानुसार बंधनकारक होते. परंतु आयोगाने हरकत कालावधी सुरू व्हायच्या दोन दिवस आधीच आदेश बदलला. यामुळे नागरिकांमध्ये असा प्रश्न निर्माण झाला आहे की ही घाई कोणाच्या फायद्यासाठी? कोणावर मेहरबानी? कोणाच्या दबावाखाली निर्णय? अशी एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.




**दुरुस्ती आदेश रद्द करा; काँग्रेस**

१४ नोव्हेंबर २०२५ चा दुरुस्ती आदेश तात्काळ रद्द किंवा स्थगित करावा. तसेच ११ नोव्हेंबर २०२५ च्या मूळ सोडतीला प्रारूप आरक्षण म्हणूनच जाहीर करावे व नागरिकांना हरकतीसाठी कायद्यानुसार संपूर्ण कालावधी द्यावा. सर्व हरकतींची त्यात तक्रारदाराचाही समावेश-एकत्र, पारदर्शक सुनावणी व्हावी. अंतिम आरक्षण निर्णय हा पूर्णपणे निष्पक्ष आणि कायदेबद्ध पद्धतीने घ्यावा. निवडणूक प्रक्रिया कितीही पारदर्शक असली पाहिजे. एका गुप्त तक्रारीवर आधीच आरक्षण बदलणे म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. आता राज्य निवडणूक आयोग या वादग्रस्त आदेशावर पुनर्विचार करतो का? जालना वासीयांसह संपूर्ण राज्याचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे. असेही स्पष्ट काँग्रेस नेत्यांनी म्हटले आहे.

### राजेवाडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत उभारला वनराई बंधारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत बदनापूर तालुक्यातील मौजे राजेवाडी येथे गट क्रमांक ८७६ मधील ओढ्यावर आज शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत चा पुढाकाराने श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्या विशेष सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कामामुळे गावातील पाणीसंवर्धनाच्या प्रयत्नांना नवी ऊर्जा मिळाली आहे. यावेळी सरपंच कमलबाई गुसिंगे, प्रतापराव गुसिंगे, उपसरपंच रेखा गुसिंगे, नोडल समन्वय अधिकारी सुशिल बोंदर, शालेय समिती अध्यक्ष रंजित शेजुळ, मुख्याध्यापक जगत घुगे, सहाय्यक शिक्षक परमेश्वर मोरे, सुपडसिंग गुसिंगे, रामसिंग गुसिंगे, जगदिश गुसिंगे, अंगणवाडी सेविका पुष्पा ओहळ, रोजगार सेवक राजेंद्र घोरपडे, नितीन चाळगे यांच्या सहशिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

या उपक्रमामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य साठा होऊन भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील जलसाठा व जल पातळी सुधारण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. शाळा, ग्रामपंचायत, ग्रामस्थांच्या सहभागातून आणि प्रशासनाच्या सक्रिय सहकार्याने उभारण्यात आलेल्या या बंधाऱ्यामुळे राजेवाडी परिसरातील जलसंपदा मजबुत होऊन शेती व पशुपालनाला आवश्यक तो फायदा होणार आहे. ग्रामस्थांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबद्दल समाधान व्यक्त करून प्रशासनाचे आभार मानले.



### जालना मनपा व उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या वतीने स्वच्छता अभियानास उत्साहपूर्ण सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**जालना शहर महानगरपालिका आणि उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष स्वच्छता व श्रमदान मोहिम राबविण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दरगड हॉस्पिटल परिसरात सकाळी ६.३० ते ८.०० या वेळेत स्वच्छता करण्यात येऊन परिसर पूर्णपणे स्वच्छ करण्यात आला.

**दर शुक्रवारी सामाजिक संस्थांतर्फे श्रमदानाची मोहिम : जवाहर बाग पोलिस चौकातून दि. २१ नोव्हेंबर रोजी अभियानाची सुरुवात**

स्वच्छता मोहिमेदरम्यान दरगड हॉस्पिटल परिसरात रस्त्यावर कचरा जाळल्याचे आढळल्याने नियमांनुसार प्रथमच ५,००० दंड आकारण्यात आला.उज्जीवन बँकेचे मॅनेजर रशिद शेख यांनी महापालिकेच्या शाळांसाठी बेंच पुरवठा तसेच एक घंटा गाडी देण्यासाठी उडठ निधीचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

दर शुक्रवारी शहर स्वच्छतेसाठी श्रमदान मोहिम

जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांच्या संकल्पातून सुरू झालेल्या या उपक्रमाचा शुभारंभ आज सकाळी १०.०० वाजता जवाहर बाग पोलिस चौकातून झाला. तेथून मोहीम डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, बडी सडक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संपन्न झाली.मोहिमेदरम्यान रहमानगंज, नाथबाबा मंदिर परिसर, नर-नारायण मंदिर, गझउ बँक रोड, कॉलेज रोड, पेन्शनपुरा, मोदीखान, कपडा बाजार, चाटे गल्ली, मिशन हॉस्पिटल परिसर या भागांमधील नाल्यांची सफाई करून कचरा हटविण्यात आला.

सुरक्षिततेसाठी नाल्यांवर लोखंडी जाळ्या बसविण्याचे आदेश तत्काळ देण्यात आले. काजीपुरा परिसरातील अतिक्रमणे हटवून क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

स्वच्छता नियमांचे उल्लंघन : दंडात्मक कारवाई

वैष्णवी कचोरी यांना स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ५,००० दंड ठोठावण्यात आला.

महापालिका शाळेला भेट

आयुक्त आशिमा मित्तल यांनी मुर्गी तलाव येथील मनपा शाळेला भेट देऊन शाळेच्या मैदानात पेव्हर ब्लॉक बसविण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले.

अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग

महापालिकेचे सर्व विभाग, विविध सामाजिक संस्था, अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, सफाई कर्मचाऱ्या आणि स्वयंसेवकांनी भरभरून सहभाग नोंदवून एक तास श्रमदान केले.




नागरिकांना आवाहन

दर शुक्रवारी शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी अशाच प्रकारच्या श्रमदान मोहिमा राबविण्यात येणार असून,

जालना शहर अधिक स्वच्छ, सुंदर व प्रदूषणमुक्त करण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त कु. आशिमा मित्तल यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813